|| न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते ||

श्री. बाळासाहेब माने शिक्षण प्रसारक मंडळ, अंबप. संचलित

# कॉलेज ऑफ एज्युकेशन (बी.एड.), अशोकराव माने विद्यानगर, पेठ वडगाव.

ता. हातकणंगले

जि. कोल्हापूर

बी. एड. सेमिस्टर भाग - I

प्रात्यक्षिक नाव - EPC-2 Drama & Art in Education

विषय -

प्रेरणा स्थान - प्र. प्राचार्या सौ. निर्मळे. आर. एल

छात्राध्यापकाचे नाव - कु माने दिव्या सागर

मार्गदर्शकाचे नाव - प्रा. सौ. सावंत. ए. पी.

रोल नंबर -

शैक्षणिक वर्ष - 2022-2023

Sawant

मार्गदर्शक स्वाक्षरी

प्राचार्य स्वाक्षरी

# E-P-C-2

# ड्रामा & आर्ट

# इन

# एज्युकेशन

Rajdhani
DATE / /

# प्रेरणास्थान -

प्र. प्राचार्या. सौ.
निर्मला आर. एल.

# अनुक्रमणिका

Rajdhani
DATE / /

| अ.नं | घटकाचे नाव | सही |
|---|---|---|
| १ | प्रस्तावना | |
| २ | उद्दिष्ट्ये | |
| 3. | Unit I- Visual Drama & Arts<br>• रांगोळी<br>• पोस्टर<br>• क्ले आर्ट<br>• पेन अन्ड इंक<br>• मेंहदी. | Bawant |
| 4. | Unit II- Performing Arts<br>1) नाटक -<br>• सामाजिक नाटक<br>• ऐतिहासिक नाटक<br>• एकांकिका<br>• बाहुली नाटक<br>• पथनाट्य<br>• साहित्य<br><br>२) कला -<br>• शिल्पकला<br>• मूर्तिकला<br>• वस्तुकला<br>• चित्रकला | |

Rajdhani
DATE / /

| अ.नं | घटकाचे नाव | सही |
|---|---|---|
| 5. | Unit III - Appereciation of Arts.<br>1) संगीत - • बाल गीत.<br>• सुगम संगीत<br>• नाट्य संगीत<br>• शास्त्रीय संगीत<br>• भक्ती गीत<br>• कृषी गीत<br>2) लोकनृत्य - लोककला<br>• लावणी<br>• लेझीम<br>• पोवाडा<br>• तमाशा<br>• गोंधळ<br>• भजन<br>• किर्तन<br>• भारुड<br>• वासुदेव<br>3) नृत्य -<br>• भरतनाट्यम<br>• कुचिपुडी<br>• मोहिनीअट्टम<br>• भांगडा नृत्य<br>• कथकली<br>• कथक<br>• ओडिसा<br>• मणिपुरी | B.[illegible] |
| 6. | स्वानुभव | |
| 7. | समारोप | |

# * प्रस्तावना *

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर अंतर्गत कॉलेज ऑफ एज्युकेशन (बी.एड्) पेठ वडगाव येथे EPC - Drama Art And Music In Education हे प्रात्यक्षिक पूर्ण करणार आहे.

यामध्ये हे प्रात्यक्षिक पूर्ण करण्यासाठी नाटक, कला, लोकगीत, लोकनृत्ये, संगीत याचा समावेश करण्यात आला आहे. हे प्रात्यक्षिक पूर्ण करण्यासाठी मा. प्र. प्राचार्या सौ. निर्मळे आर.एल यांची प्रेरणा मिळाली व प्रा. सौ. सावंत ए.पी., प्रा. सौ. शिरतोडे मॅडम, प्रा. सौ. चरणकर मॅडम, प्रा. श्री. सोरटे एस.के. सर यांचे मार्गदर्शन मिळाले.

# उद्दिष्टये

विद्यार्थी शिक्षकांना सक्षम करण्यासाठी

1) विविध नाटक आणि कला प्रकारांची मूलभूत माहिती समजून घेवून नाटक आणि कला या कलेबद्दल मनामध्ये जागृकता वाढवणे.

2) विद्यार्थ्यांमध्ये कलात्मक आणि सौंदर्यविषयक संवेदनशीलता वाढवा जेणे करून ते त्यांच्यातील सौंदर्याला प्रतिसाद देऊ शकतील आणि कल गुणांना वाव मिळेल.

3) माध्यमिक स्तरावर शालेय अभ्यासक्रमात विविध कला प्रकारांना एकत्रि करण्यासाठी कौशल्य वाढवणे.

समृद्ध सांस्कृतिक वारसा, कलाकार आणि कारागीर यांच्याबद्दल जागरूकता वाढवणे.

# Unit -1

# Visual Drama And Arts

# Unit - I

# Visual Drama And Art

( दृश्य नाटक आणि कला)

दृश्य नाटक आणि कलेच्या वेगवेगळ्या सामग्रीसह प्रयोग जसे की पोस्टर, पेन आणि शाई, रांगोळीचे साहित्य, माती, नाटक नाद, एकांकिका इ.

नाटक आणि कलांच्या विविध पद्धतींचा शोध सादरीकरण आणि प्रयोग करणे.

DATE / /

# रांगोळी

प्रस्तावना :-

रांगोळी ही भारतीय प्राचीन सांस्कृतिक परंपरा आणि लोककला आहे. भारताच्या वेगवेगळ्या प्रांतांत रांगोळीचे वैविध्य दिसून येते पण त्यामागील निहित भावनेत आणि संस्कृतीमध्ये बरीचशी समानता आहे.

अंगणामध्ये रांगोळी रोज काढली जाते. जेवणाच्या ताटाभोवती काढतात. दिवाळी किंवा तिहार, ओणम, पोंगल आणि भारतीय उपखंडातील हिंदू सणाच्या वेळी घरासमोर रांगोळी हमखास काढतात. रांगोळ्यांच्या डिझाईन्स यांच्यातील कला आणि परंपरा दोन्ही जिवंत ठेवून एका पिढीकडून दुसऱ्या पिढीपर्यंत पाठविल्या जातात.

रांगोळीचा हेतू म्हणजे शक्ती उदारता जाणवणे आणि नशीब मिळवणे हे आहे. परंपरा, लोकसाहित्य आणि प्रत्येक क्षेत्रासाठी खास असलेल्या पद्धती प्रतिबिंबित केल्यामुळे डिझाईनचे वर्णनदेखील भिन्न असू शकते. हे पारंपारिकपणे मुली किंवा महिलांनी केले आहे.

सौंदर्याचा साक्षात्कार व मंगलाची सिद्धी हे रांगोळीचे दोन उद्देश. रांगोळीच्या ज्या आकृत्या काढतात त्या प्रतिकात्मक असतात. स्वास्तिक, सूर्य, चंद्र, तारे, चक्र, चक्रव्यूह, त्रिशूळ, वज्र, कलश अशा प्रतिकांचा समावेश असतो. रांगोळीतील प्रतिके ही अध्यात्मिक अनुभूती देतात अशी धारणा रांगोळी काढण्यामागे दिसून येते. रांगोळीमध्ये स्वास्तिक, गोपदम, शंख, चक्र, गदा, कमळाचे फूल, बिल्वपत्र, लक्ष्मीची पावले, सूर्य देवतेचे प्रतिक, श्री, कासव इ. मांगल्य सूचक रांगोळ्या काढल्या.

## रांगोळी म्हणजे काय -

रांगोळी म्हणजे भूमी - अलंकरण भूमीला सजविण्यासाठी, देवघरातील देव्हारा, अंगण, भोजनाची पंगत, शुभकार्यस्थळ इ. जागा सुशोभित करण्यासाठी शंखजिऱ्याची भाजून केलेली पांढरी पूड, तांदुळाची पिठी, खडू इ साहित्याने काढलेल्या विविध चित्राकृतींना रांगोळी असे म्हणतात. त्यात रंग भरुन ती अधिक आकर्षक बनविली जाते.

भारतात रांगोळीला धार्मिक तसेच सांस्कृतिकदृष्ट्या फार महत्त्व निर्माण झालेले आहे.

## रांगोळीचा उगम --

अनेक भारतीय कलांप्रमाणेच रांगोळीचे नातेही प्राचीन भारतीय संस्कृतीशी आहे. ऐतिहासिक काळापासून रांगोळीचे अस्तित्व असल्याचे दाखविता येते आणि संस्कृतीच्या विकासाचे प्रतिबिंबही रांगोळीत पडल्याचे प्रत्ययास आणता येते. रांगोळी जशी प्राचीन भारतीय परंपरेचा वारसा सांगते रांगोळीद्वारे मूर्त रूपे निर्माण केली जातात आणि अमूर्त अशा संकल्पनांचा बोधही होतो. रांगोळी या कलेचा उगम धर्माच्या अनुबंधातच झालेला आहे, ही बाब ध्यानी घेतली की धर्मप्रवण भारतीय समाजातील तिचे स्थान लक्षात येते. रांगोळीसाठी लागणाऱ्या वस्तू सहज व सर्वांना उपलब्ध होणाऱ्या आहेत, आणि रांगोळी काढणे फारसे अवघडही नसते. प्राचीन काळी चित्रकलेची सुरूवात झाली ती रांगोळीपासूनच झाली असे म्हणता येते.

रांगोळीचा इतिहास -

रांगोळीला अल्पना असं सुद्धा म्हटलं जातं. रांगोळी म्हणजेच अल्पना चिन्ह ही अगदी मोहेंजदडो आणि हडप्पा संस्कृतीच्या खुणा- मध्येही आढळली आहेत. अल्पनेचा समावेश हा कामसूत्राने वर्णन केलेल्या चौसष्ट कलांमध्येही होतो. ही एक अतिप्राचीन लोककला आहे. अल्पना या शब्दाची उत्पत्ती ही संस्कृत शब्दातील ओलपेन या शब्दातून झाली. याचा अर्थ लेप करणे असा होतो. प्राचीन काळी लोकांचा असा विश्वास होता की, कलात्मक चित्रांनी शहर आणि गाव धनधान्याने समृद्ध राहतात. याच दृष्टिकोनातून अल्पना धार्मिक आणि सामाजिक समारंभांच्या वेळी काढण्याची प्रथा सुरु झाली. रांगोळीचा उल्लेख आर्य युगातही आढळतो.



# मेहंदी

प्रस्तावना -

सण कोणताही असो, महिलांना मेहंदी काढण्यासाठी फक्त निमित्त हवे असते. हिंदू धर्मात मेहंदी काढणे शुभ मानले जाते. भारतीय परंपरेत विवाह सोहळ्याला नववधूला मेहंदी काढण्याची पद्धत आहे. सिनेमातील मेहंदीवर रचलेली गाणी व नृत्य अशा मनोरंजक कार्य-क्रमांची धमाल असल्याशिवाय हा लग्नविधी पूर्ण होत नाही. प्रत्येक नववधू या मेहंदीच्या विधीची अगदी आतुरतेने वाट बघते. अशात तिच्या हातावर रंगलेली मनमोहक मेहंदीची डिझाईन तिच्या या आनंदात अधिक भर घालते.

असे म्हटले जाते की, हातावरील मेहंदीचा रंग जितका गडद चढतो तितके नववधु व तिच्या जोडीदारातील प्रेम अधिक दृढ होते. त्याच-प्रमाणे अजून एक असा समज आहे की, जितके जास्त दिवस तिच्या हातावर मेहंदी टिकते तितके जास्त त्या नववधूला तिच्या सासरी प्रेम मिळते. मेहंदीच्या निरनिराळ्या डिझाईन्स मध्ये देखील जीवनातल्या अनेक गोष्टींचे संकेत लपलेले असतात.

• मेंहदीचे प्रकार

① अरेबियन -
नेसर्ग शैली आणि सगळा आधुनिक गोष्टींची सांगड घालून, अरेबिक डिझाईन करण्यात येते. भारतिय मेंहदीची तुलना सरवी अरबानि मात्र ही मेंदी अतिशय सोपी आणि सुंदर दिसते.

② बॉर्डर डिझाईन -
बॉर्डर मेहंदीची डिझाईन सर्वाचं लक्ष वेधून घेतं आणि आकर्षित करते. या डिझाईन्समध्ये सर्व बॉर्डर्स हायलाईट करण्यात येतात आणि त्यामध्ये अतिशय बारिक आणि आकर्षक मेंदीची डिझाईन काढण्यात येते.

③ पारंपारिक डिझाईन -
पारंपारिक डिझाईनमध्ये लग्नाच्या वेळी तयार कलश आणि ढोल ताशे यांची आकृती काढण्यात येते. यामध्ये लग्नातील विधीं-ना प्राधान्य असून वरमाळा, नवरीची डोली याप्रकारचे डिझाईन्स काढण्यात येतात.

④ दुल्हन मेंहदी -
लग्नात नवरीचं रूप आणि सौंदर्य अधिक खुलून दिसावं यामागील प्रमुख हेतू असतो. कारण मेंदीमुळे नववधूचे हात आणि पाय अधिक सुंदर आणि नाजूक दिसतात. हातापायावरील नाजूक मेंदीच्या डिझाईनमुळे तिचे हातपाय इतरांपेक्षा अधिक आकर्षक दिसतात.





# पोस्टर

जेव्हा आपण एखाद्या सामाजिक विषयावर चित्राच्या माध्यमातून संदेश देऊन जनजागृती करतो त्यात आपण चित्रासोबत संदेशही लिहितो अशा प्रकारच्या चित्राला भित्तीचित्र म्हणजेच पोस्टर ड्रॉइंग असे म्हणतात

पोस्टर म्हणजे भित्तीचित्राच्या माध्यमातून एखादा संदेश देणे जाहिरात करणे किंवा घोषणा देणे. एक चांगले पोस्टर किंवा घोषणा देणे, येणाऱ्या जाणाऱ्याचे लक्ष वेधून घेते पोस्टरच्या उपयोग संदेश देणे किंवा भावना प्रबळ करणे.

पोस्टर तयार करण्यासाठी काही महत्त्वाचे मुद्दे-

चित्रे, आकार, रेखाटन -

पोस्टर करताना वापरण्यात येणारे निवडक चित्रे किंवा आकार यांचे वेगवेगळ्या पद्धतीने स्केचेस करून निवडक व प्रभावी आकार किंवा चित्रांची निवड करून पोस्टरमध्ये वापरावीत.

शीर्षक घोषवाक्य किंवा घोषणा -

भित्तीचित्र तयार करताना आकारांची जी चित्रांची रचना संतुलित वा आकर्षण असणे गरजेचे असते.


जर भित्तीचित्र तयार करण्यासाठी आपण शीर्षक निवडले तर ते कमी शब्दात असणे गरजेचे आहे. तसेच भित्तीचित्रातील घोषवाक्य म्हणजेच स्लोगन हे कमी शब्दात जास्त अर्थपूर्ण असणे आवश्यक आहे.


आकर्षक रचना -

भित्तीचित्र तयार करताना आकाराची किंवा चित्रांची रच संतुलित व आकर्षक असणे गरजेचे आहे.

घ) संदेश -
भित्तीचित्राच्या माध्यमातून देण्यात येणारा संदेश थोडक्यात, मनाला भिडणारा असावा.

ङ) चिन्ह, लोगो, सिम्बॉल -
भित्तीचित्र तयार करताना सांकेतिक चिन्ह, लोगो किंवा सिम्बॉल वापरल्यास पोस्टर करुन पटकन समजते किंवा पोस्टर कोणामार्फत आहे हे समजते.




Save Water

Rajdhani
DATE / /


# Pen - Ink

कला ही कालानुसार वेगवेगळ्या माध्यमांना जन्म देते कलाकार हा या सर्व माध्यमांवर प्रयोग करत आला आहे. यातीलच एक माध्यम आहे. पेन व शाई (Pen and Ink)

- इतिहास :-

पहिला फाऊन्टेन पेन 1702 मध्ये फ्रान्सच्या के. एम. बायोन यांनी तयार केले. विसाव्या शतकात रिफिलचे पेन अस्तित्वात आले ज्यामध्ये प्लास्टिकच्या रिफिलमध्ये घट्ट शाई भरलेली असते. काही कालांतराने यालाच बॉलपेन म्हणून ओळखले जाऊ लागले.

आपल्याला वेगवेगळ्या प्रकारचे कलर असणारे अनेक पेन मिळतात. ज्यांचा वापर करून वेगवेगळ्या प्रकारचे डिझाईन तयार करू शकतो.



# Clay Art

प्राचीन काळापासून मातीचा उपयोग विविध कला वस्तू बनविण्या-करिता होत आहे. निसर्गात आढळणारे मातकट अतिसूक्ष्मकणी द्रव्य म्हणजे मृत्तिका (माती) होय. मातीत मर्यादित प्रमाणात पाणी मिसळल्यावर लवचिक झाल्यामुळे तिला हवा तो आकार देता येतो. म्हणजेच माती सुकार्य होते सुकार्यता हा मातीचा आवश्यक गुणधर्म आहे. मातीच्या वस्तूच्या आकार सुकल्यावर घट्ट घेवून तसाच टिकून राहतो. तसेच दीर्घकाळ अग्नीच्या संपर्कात आल्यास दगडासारखा टणक होतो.

कलानिर्मितीसाठी हातांना न चिकटणारी तसेच विविध आकार लवकर धारण करू शकणारी माती लागते. या मातीला सर्वसामान्यपणे चिकणमाती (clay) असे संबोधतात. माती हे शिल्पकलेतील सर्वात प्राचीन नव्हे तर प्राथमिक माध्यम आहे. प्राचीन काळी मानवाला लक्षात आले की, माती हाताला न चिकटता विविध आकार लवकर धारण करू शकते तेव्हापासून मानव कला निर्मितीसाठी दैनंदिन वापरायच्या वस्तू बनवू लागला.

क्ले आर्ट, ज्याला क्ले मॉडेलिंग म्हणूनही ओळखले जाते. माती-दागिने, पेंटिंग्ज आणि बरेच काही तयार करण्यासाठी विविध आकारा-मध्ये मोल्डिंग करण्याची कला आहे. मातीची भांडी आणि दागिन्यांचा सराव करणारे बरेच कलाकार आहेत, तर मातीचे चित्रकार फारच कमी आहेत. आधुनिक शैलीतील मातीची चित्रे कोरलीन आणि चिकन रन सारख्या स्टॉप मोशन फिल्ममध्ये क्ले ॲनिमेशन म्हणून पाहिली जाऊ शकतात.





# Unit - 2

# Performing Arts

# Dance, Music, Theatre And Puppetry

# Unit - 2

## Performing Arts: Dance, Music, Theature And Puppetry

[परफॉर्मिंग आर्टस् - नृत्य संगीत, थिएटर आणि कठपुतळी]

1) संगीत नृत्याचे प्रादेशिक कला प्रकार ऐकणे / पाहणे आणि एक्सप्लोर करणे, थिएटर आणि कठपुतळी

2) शास्त्रीय संगीत आणि प्रादेशिक कला प्रकारांचे थेट आणि रेकॉर्ड केलेले प्रदर्शन पाहणे / ऐकणे कोणत्याही एक प्रादेशिक कला प्रकारातील सहभाग आणि कामगिरी लक्षात घेऊन एकात्मिक दृष्टिकोन.

3) विद्यार्थी - शिक्षकाद्वारे परफॉर्मन्स / प्रेझेंटेशनसाठी स्टेज - सेटींगची योजना करणे.

# नाटक

नाटक सादरीकरणाची शैली म्हणजे 'अभिनय' नाट्यार्थ प्रेक्षकापर्यंत पोहोचवण्यासाठी जे जे केले जाते ते सर्व म्हणजे अभिनय. 'अभि' म्हणजे कडे (प्रेक्षकांकडे) नी म्हणजे नेणे. नाट्याशयाला प्रेक्षकांकडे नेतो तो अभिनय. नाट्यामध्ये आठ रस सामावलेले आहेत.

नाटक ही एक व्यामिश्र कला आहे नाट्य प्रयोगात कला आणि विद्या यांचे उपयोजन केले जाते. 'नाट्यशास्त्र' हा भरतमुनी यांनी रचलेला ग्रंथ ज्यात भारतीय रंगभूमीची व्याख्या केलेली आहे. नाटकातून लोकजीवनातील वृत्ती, प्रवृत्तींना, समुद्ध भाव परिपोष करणाऱ्या वेगवेगळ्या घटना प्रसंगातून प्रेक्षकांच्या साक्षीने रंगमंचावर सादर केला जातो. सर्व विद्यांचा आणि शास्त्रांचा संग्रह करुन लोकांना उपदेश करण्यासाठी आणि त्याचे मनोरंजन करण्यासाठी भारतीय नाटक निर्माण झाले. नाटकात अनेक कलांचा संगम झालेला दिसून येतो. संगीत, नृत्य, चित्रकला, शिल्पकला, वास्तुकला आदी कलांचा अंतर्भाव नाटकात आढळतो.

नाटक दृक व श्राव्य असा एक वाङ्मयीन मनोरंजक प्रकार आ पाणिनीने नाटक हा शब्द नट्-नाचणे, अभिनय करणे या धातूवरून मांडला आहे. नाटक म्हणजे जिवंत, मृत, पौराणिक, ऐतिहासिक, काल्पनिक व्यक्ती, प्राणी यांच्या भूमिका करणाऱ्या नटांनी सादर केलेली रंगमंचावर साकारलेली किंवा बहुदा संवादात्मक अभिनयात्मक नृत्यमय किंवा कथात्म कलाकृती असू शकते. नाटकामध्ये शब्दसंहिता, कथानक, संवाद, पदे, नाट्य संगीत, पार्श्वसंगीत, संघर्ष, नृत्य, वेश, रंगभूषा, प्रकाशयोजना अभिनय म्हणजे कथानक असू शकते.

चरित्र, कथावस्तू, विषय, संवाद, रूपांकन, प्रेक्षक आदी नाटकाच्या मूल्यद्रवातूनच नाटक निर्माण होते. नाटक ही ललितकला आहे

Drama is a greek word it means to do or to out. Dramatisation is an attempt to do or act as somebody has done.

- नाटकाचे प्रकार :-

वेगवेगळ्या गोष्टींचा आधार घेऊन नाटकाचे वर्गीकरण वेगवेगळ्या प्रकारे करता येते. हे वर्गीकरण पुढीलप्रमाणे करता येईल.

- नाटकांचे लांबीनुसार वर्गीकरण :-

① नाट्यछटा : प्रयोग कालावधी काही मिनिटे
② एकांकिका : ३० ते ४५ मिनिटे
③ दिर्घांक : सव्वा ते दीड तास
④ लघुनाटक : सव्वा ते दीड तास
⑤ नाटक : तीन ते सहा तास
⑥ दीर्घनाटक : प्रयोग कालावधी ९ तास

- नाटकाचे कालानुसार वर्गीकरण :-

① पौराणिक : उदा. सौभद्र
② मिथक धारीव : उदा. ययाती
③ ऐतिहासिक : उदा. भाऊबंदकी
④ सामाजिक : उदा. भाऊबंधन
⑤ भविष्यनाटक : उदा. चारशे कोटी किसको
⑥ राजकीय नाटक : उदा. किचकवध

- नाट्यलेखन कालानुसार वर्गीकरण :-

1) अभिजात नाटक (क्लासिक)
2) मॉडर्न नाटक (आधुनिक)
स्थलकालिक नाटक (तमाशा, लोकनृत्य)
अलिखित तात्कालिक स्फुर्ती नाटक (सोंगाड्याची बतावणी)

नाट्यस्थळावरून वर्गीकरण :

1. दालनाट्य
2. परिसर रंगभूमी
3. रिंगण नाट्य
4. रंगमंच नाट्य
5. निकटमंच नाट्य
6. लोकनाट्य (मंदिरात, पटांगणात, जत्रेत, तंबूत)

त्याचप्रमाणे सर्वसाधारणपणे नाटकांचे प्रकार खालीलप्रमाणे सांगता येतील

1. पौराणिक नाटक
2. बाहुली नाटक
3. भक्ती नाटक
4. भय नाटक
5. प्रायोगिक नाटक
6. भारुड
7. महानाटक
8. मूकनाटक
9. रिंगनाटक
10. संगीत नाटक
11. सामाजिक नाटक
12. समस्याप्रधान नाटक
13. फिजीकल नाटक
14. पथनाट्य

# ऐतिहासिक नाटके

ऐतिहासिक नाटकांमध्ये इतिहासात घडलेल्या घटना रंगमंचावर पुर्ननिर्मित केल्या जातात. "जाणता राजा" हे महानाट्य शिवरायांचा जीवनपट मांडते. ऐतिहासिक नाटक हे ऐतिहासिक कथा व व्यक्तिरेखांवर आधारित नाटक होय. यातील काही सत्य आणि काही काल्पनिक गोष्टींवर आधारित असतात.



# सामाजिक नाटक

मराठीतील स्वतंत्र नाटकांना सुरुवात झाली ती सामाजिक नाटका-पासून जोतीराव फुले हे पहिले मराठी नाटककार आहेत सामाजिक नाटकामध्ये अंधरि किंवा सामाजिक समस्या मांडली जाते बालविवाह, हुंडाबळी अंधश्रद्धा बालकामगार अशी एखादी समस्या नाटकाच्या रूपात मांडली आहे.






Rajdhani
DATE / /

# एकांकिका

एकांकिका म्हणजे एक अंकी नाटक, स्थलकालाच्या मर्यादित अवकाशात आपल्या सर्व नाट्यशक्ती एककेंद्रीत करणारा थोडक्यात उत्कृष्ट एकसंघ व एकजिनशी परिणाम साधणारा संपूर्ण, स्वयंपुर्ण, एक अंकी नाट्य-प्रकार म्हणजे एकांकिका. एकांकिका सुमारे अर्धा ते पाऊण तासाची असते. ती बहुरूपिणी असते. तिला कोणत्याही विषयाचे वावडे नसल्याने ती काव्यमय, चर्चात्मक, प्रहासनासारखी, तत्वचिंतनपर किंवा रहस्यकथेसारखी असू शकते.

इ. स. १९५० मध्ये मुंबईमधील भारतीय विद्याभवन या संस्थेने आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धा घ्यावयास सुरुवात केली आणि मराठीत एकांकिका हा नाट्यप्रकार बहरास आला.





# बाहुली नाटक

कठपुतली म्हणजे लाकडापासून तयार केलेल्या वेगवेगळ्या प्रकारच्या छोट्या बाहुल्या त्यांना रंगही दिलेला असतो आणि वेशभूषाही असते. या बाहुल्यांना बारीक लांबून न दिसणारे धागे बांधून त्या नाचविल्या जातात. कठपुतल्या चालविणारा कटपुतलीकार पडद्या आडून हे काम बोटांच्या व हातांच्या साहाय्याने करीत असतो. तो लोकांना दिसत नाही. बाहुल्यांच्या हालचालीतून हे नाट्य रंगविले जाते. पडद्यामागे बहुदा दुसरा इसम त्या नाटकातले संवाद बोलत असतो. त्यानुसार कटपुतलीकार बाहुल्या नाचवितो असतात हे एक मनोरंजनाचे व लोककलेचे साधन आहे. वेगवेगळ्या देशात वेगवेगळ्या प्रकारच्या बाहुल्या बनवून त्या वापरल्या जातात



# पथनाट्य

प्रेक्षकांनी नाटक बघण्यासाठी नाट्यगृहात जाण्याऐवजी जेव्हा समाज प्रबोधनासाठी नाटककारच ठिकठिकाणी प्रेक्षकांपर्यंत पोचून अगदी साधे-पणाने व संक्षिप्त रूपात एखादा प्रभावी संदेश जनतेपर्यंत पोहचविणे म्हणजेच पथनाट्य (street plays) हे नाट्य अगदी रस्त्याच्या कडेला-देखील केले जाते जेणेकरून त्यांचा संदेश जास्तीत जास्त लोकांपर्यंत या नाट्यातील संदेश पोचू शकेल.






# कला

* प्रस्तावना :-

कला हा शब्द 'कल' या धातूपासून तयार झालेला आहे कल म्हणजे सुंदर, कोमल, मधुर किंवा सुख देणारे आणि त्याला अनुकूल असेल ती कला. कल करणे - पुरणे, वाजविणे यावरून तत्सबद्ध ती कला, कल - मदमस्त करणे, प्रसन्न करणे, तदनुकूल ती कला - कुम् आनन्द लाति इति = आनंद देणारी ती कला.

प्राचीन काळापासून कला हे मानवी जीवनाचे एक महत्त्वाचे अंग बनले आहे. जे जे सौंदर्यपूर्ण व कलात्मक आहे तेथे मानव आकर्षिला जातो. तेव्हा तो कलेचा भक्त होतो. जसजसा मानवाचा सांस्कृतिक विकास होत जातो.

• कलेचे प्रकार :-

- कला
  - हस्तकला
    - विणकाम
    - शिवणकाम
    - पाककला, गृहसजावट इ.
    - विविध वस्तूंची निर्मिती
  - ललितकला
    - दृककला → चित्र
    - दृकस्पर्शकला → शिल्प
    - श्राव्यकला → संगीत
    - दृकश्राव्य-कला → नाट्य

Rajdhani
DATE / /

## चित्रकला :

चित्रकला हा कलेचा एक प्रकार आहे मानवसर्जनशीलतेचा आविष्कार यातून दिसून येतो चित्रकलेचा इतिहास, भविष्य पुरातन आहे. लिओनार्दो द व्हिन्ची, रॅफेल असे अनेक महान चित्रकार ऐतिहासिक कालखंडात होऊन गेलेत छाया प्रकाशाची संगती बिघडली की चित्र योग्य वाटत नाही छाया रंग यांच्या साहाय्याने आपली दृष्टी संवेदना चित्र हे अर्थपूर्ण करीत असतो काही रंग एकमेकांना उठाव देणारे तर काही रंग एकमेकांना मारक ठरणारे असतात चित्रकाराला ही रंगसंगती अवगत असते म्हणूनच तो रंगाची निवड किंवा संमिश्रण करु शकतो. म्हणूनच सुंदर चित्रकला छाया प्रकाशाची मौज असे म्हटले जाते चित्रकला ही अशाप्रकारे दृष्टिसंवेदनांच्या कौशल्याचे एक सुंदर प्रतीकच आहे.

### चित्रांचे प्रकार :-

1) सांप्रदायिक प्रसंग
2) व्यक्तीचित्र
3) सामाजिक प्रसंग
4) निसर्ग चित्र
5) सामुदायिक देखावे.





शिल्पकला -

वैदिक कालात विविध व्यावसायिकांचा (वढा सोनार) उल्लेख आहे त्यावरून कदाचित त्याकाळी शिल्पकलेचे ज्ञान असावे. कापड, दागिने घडवणे हे देखील कलेशी संबंधित आहे मोहनजोदडो व हडप्पा संस्कृतीत पक्ष, पशुपती, नर्तकी, दाढीवाला मनुष्य, मातीची भांडी अशा कलेच्या सुंदर वस्तू आपल्याला आढेत मौर्यकाळातील शिल्पकृतींचे अवशेष आज देखील पहावयास मिळतात सारनाथ येथील स्तंभावरील चार सिंहाची मूर्ती ज्याचे चित्र भारताच्या राजमुद्रेवर आहे. डॉ. स्मिथच्या मते, उत्तम मूर्ती बनवण्याची कलेचे ज्ञान भारताव्यतिरिक्त अन्यत्र कुठे दिसत नाही. भारतातील शिल्पकला ही बुद्धाचे जीवन, धार्मिक कथा यावर आधारित आहे.

शिल्पकलेचे तीन प्रकार दिसतात.

① गांधार कला
② मथुरा कला
③ अमरावती कला

याशिवाय संगीत ही एक प्रमुख दृकश्राव्य कला आहे.





## मूर्तीकला :-


एखादी प्रिय व्यक्ती ~~दृष्टिसमोरे~~ दृष्टिसमोर नसताना तिच्या विषयी प्रेमादर व्यक्त करण्यासाठी किंवा तिचे स्मारक म्हणून तिची प्रतिमा तयार करण्याची प्रथा फार प्राचीनकाळापासून चालू आहे. मानवी बुद्धी विकसित झाल्यानंतर त्याने प्रिय व्यक्तीच्या प्रतिमे-प्रमाणेच दैवी शक्तीच्या प्रतिमाही मानवी रुपात बनवण्यास प्रारंभ केला.






## वास्तूकला -

वास्तूकला वैदिक काळात विकसित झालेले दिसते. ऋग्वेदात पुर, तक्ष, शुल्वेतता सभा शब्दावरून स्पष्ट करून होते की, वैदिक काळात लहान-मोठी इमारती बनवल्या जालात वास्तूकलेच्या संबंधी, नगर रचना, दुर्ग, जलाशय, मानस्तंभ, स्मारकशिला, मठ, मंदिर, वास्तु, स्थापत्य, कुंड, विहार, आड, कल्लोळ, मंडपयुक्त, बाग, पोखरणी, तडाग यांच्या निर्मिती संबंधी विशिष्ट तत्त्वे होती असे दिसते





# UNIT-3

# Appreciation of Arts

# Unit 3 -

## Apperication Of Arts

(कलेचे कौतुक)

1) कला आणि सौंदर्यशास्त्र यांचा अर्थ आणि संकल्पना आणि दुय्यम स्तरावर त्याचे महत्व शालेय शिक्षणाची पातळी कला शिक्षणामध्ये काय फरक आहे. आणि शिक्षणातील कला काय आहे.

2) विविध परफॉर्मिंग कला आणि कलाकारांची ओळख नृत्य, संगीत आणि संगीत वाद्ये, रंगमंच, कठपुतळी इ.

- (संचावर आधारित, हेतूसाठी निवडलेला)
- भारतीय हस्तकला परंपरांचे ज्ञान आणि त्याची शिक्षणातील प्रासंगिकता.
- समकालीन कला आणि कलाकारांचे ज्ञान, दृश्य नाटक, भारतीय सण आणि त्यांचे महत्व.

# संगीत

# संगीत

संगीत हा शब्द दोन शब्दांच्या संयोगातून बनला आहे. सम आणि गीत , सम शब्द अनेक अर्थांनी वापरला जातो. उदा. सहित, उचित, प्रिय, मनाला अनुकूल गीत शब्दाचा अर्थ आहे.

गायन , वादन व नृत्य यांच्या तिहेरी संगमाला संगीत असे म्हणतात संगीत हे सर्वांनी ऐकले पाहिजे. संगीत हे प्रत्येकासाठी वेगवेगळ्या प्रकारात उपलब्ध आहे संगीत ऐकल्याने आपले मन प्रसन्न होते संगीत माणसाला मानसिक स्वास्थ्य प्रदान करण्य करते किंवा करण्याचे माध्यम आहे स म्हणजे स्वर 'गी' म्हणजे गीत आणि त' म्हणजे ताल होय. संगीत कला ही सर्व कलांमध्ये श्रेष्ठ आहे.

## भारतीय संगीत :-

भारतीय संगीत तीन भागांमध्ये विभागले जाऊ शकते.

1. शास्त्रीय संगीत
2. उप महाद्वितीय
3. सुलभ संगीत

भारतीय शास्त्रीय संगीताच्या दोन मुख्य पद्धती पुढीलप्र -णे सांगता येतील.

① हिंदुस्थानी संगीत → हे ~~उ~~ उत्तर भारतातील लोकप्रिय संगीत आहे.

② कर्नाटकी संगीत → हे दक्षिण भारतातील लोकप्रिय संगीत आहे.



भारतामध्ये संगीताचे प्रकार पुढीलप्रमाणे आढळून येतात

1. सुगम संगीत
2. नाट्य संगीत
3. बालगीते
4. कृषीगीत
5. भक्तीगीत
6. शास्त्रीयसंगीत
7. संगीतातील राग
8. संगीतविषयक ग्रंथ

- **शास्त्रीय संगीत :-** भारतातील शास्त्रीय गायक हे खूप प्रधान आहेत. संगीतामध्ये उत्तर हिंदूस्थानी व कर्नाटकी अशा दोन श्रेणी आहेत.

- **भाव गीत :-** अभंग, ओवी, लावणी याचप्रमाणे भावगीत हा सुगम संगीताचा प्रकार आहे.

- **भक्ती गीते :-** भक्तीगीतामध्ये देवावरील श्रद्धा, निष्ठा व्यक्त के

Rajdhani
DATE / /

# सुगम संगीत

सुगम संगीत शास्त्रीय संगीताचा एक संगीत प्रकार हा प्रकार नावाप्रमाणे सुगम संगीत व शास्त्रीय रागदारी संगीत यांच्यातील विशिष्ट सौंदर्यगुण घेऊन निर्माण झालेला सुगम संगीत व शास्त्रीय संगीत या दोन संगीत प्रकारच्या दरम्यानची अवस्था असलेला, संगीताचा प्रकार आहे सुगम संगीतामध्ये स्वर आणि लय यांच्या मदतीने काव्य रचनेतील अर्थ व भाव व्यक्त करणे हा महत्त्वाचा भाग आहे. या संगीतातील गळा हलका असावा लागतो सुगम शास्त्रीय संगीतात ठुमरी हा प्रकार अत्यंत लोकप्रिय आहे.



# नाट्य संगीत

मराठी संगीत नाटक ही रंगभूमीने जागतिक रंगभूमीला दिलेली देणगी आहे. असे मानले जाते. भारतीय संगीत परंपरेतील विविध सांगितीक आकृतीबंध नाट्यसंगीतातून प्रत्ययास येते. ध्रुपद - धमारापासून ते गजल कव्वालीपर्यंत आणि भावगीतापर्यंत हे वैविध्य दिसते ख्याल, तराणा, ठुमरी, कजरी, टप्पा, चैती, गजल, कव्वाली, लावणी, साकी, दिंडी आर्या, अभंग, स्त्रीगीते असे अनेक प्रकार नाट्यसंगीतातून मुक्तपणे वापरलेले दिसतात.





# कृषीगीत

कृषी म्हणजे शेतकरी. शेतकरी ही शेती धारण करणारी व्यक्ती असते रात्रंदिवस काबाडकष्ट करून शेतकरी धनधान्य पिकवतात. भारताची अर्थव्यवस्था देखील शेती उद्योगाशी निगडीत आहे. अशा या शेतकऱ्यांवर आणि त्यांच्या शेतजमिनीवर कवी गीत रचना करतात त्यालाच कृषीगिते म्हणतात. यामध्ये त्यांच्या व्यथा, जमिनीबद्दलची माया, शेतकरी मित्र बैल इ. विषयांवर गीते रचलेली असतात.



# लोकनृत्य

# लोकनृत्य

समाजामधून विविध गटातून तयार केलेली गीते, कविता, संकल्पना यांचा समावेश लोककलांमध्ये होतो.

प्रकार :
1. लावणी
2. लेझीम
3. पोवाडा
4. तमाशा
5. भजन
6. किर्तन
7. भारूड
8. गोंधळ
9. वासुदेव

अशा प्रकारचे वर्गीकरण आपण दोन गटात करू शकतो. लोकनृत्य व लोकगीते.

लोकनृत्य - जनसामान्यांमध्ये प्रचलित असलेले परंपरागत अलिखित नृत्यप्रकार म्हणजेच लोकनृत्य होय.

भारतातील लोकनृत्य --

| नृत्य | राज्य |
| --- | --- |
| खिनजोगी नृत्य | हरियाना |
| वाघ्यामुरळी नृत्य | महाराष्ट्र |

| | |
|---|---|
| तारली | कोकण |
| बिहु | आसाम |
| भेतारुी | गुजरात |

भारताबाहेरील लोकनृत्य:-

① असिरियन नृत्य
② इस्त्रायली नृत्य
③ जपानी पारंपारिक नृत्य
④ बार्न नृत्य

महाराष्ट्रातील लोकनृत्य:-

① लावणी
② लेझीम
③ तमाशा
④ गोंधळ
⑤ पोवाडा
⑥ भजन
⑦ किर्तन
⑧ भारुड
⑨ वासुदेव



# लावणी

लावणी हा महाराष्ट्रातील कलाप्रकार आहे लवण म्हणजे सुंदर या शब्दानुसार लावणी हा शब्द तयार झाला आहे 'लास्य' हा या रसाचे दर्शन घडविणारी लावणी हा महाराष्ट्राचा अतिशय लोकप्रिय लोककला प्रकार आहे. लावणी म्हणजे गीत, नृत्य आणि अदाकारी यांचा त्रिवेणी संगम लावणीमध्ये ढोलकी व तुणतुणे या वाद्यांच्या साथीने सादर केली जाते.

लावणीचे मुख्यत: तीन प्रकार आहेत.

① नृत्यप्रधान लावणी

② गानप्रधान लावणी (बैठकीची लावणी)

③ अदाकारी प्रधान लावणी

जुन्नरी, हौद्याची, बालेघाटी, छक्कड पंढरपुरीबाजी अशी लावणीची विविध रूपे आहेत.






# लेझीम

लेझीम हे महाराष्ट्रातील एक लोकनृत्य आहे. धार्मिकउत्सवाच्या काळात हे विशेषत, गणेश चतुर्थीला मोठ्या प्रमाणात खेळले जाते. महाराष्ट्रात याचा उगम असला तरी जगभरात विविध ठिकाणी बऱ्याच वेळा लेझीम खेळली जाते.

२०१४ मध्ये सांगलीतील तब्बल ६८८८ लोकांनी एकाच वेळी लेझीमचे सादरीकरण केले होते. याची नोंद गिनिजबुकात नोंद केली गेली. लेझीम नर्तक एक लहान वाद्य वाजवतात. त्याला झिंगल असते. त्याला लेझीम म्हणतात. लेझीम किमान 20 नर्तक असतात. या नृत्याला लाकडी वाद्याचे नाव देण्यात आले आहे. ज्यामध्ये पातळ धातूच्या चकती बसवल्या जातात. नर्तक नृत्य करताना याचा वापर करतात.



DATE / /

# पोवाडा

पोवाडा हा वीर रसातील आणि गायनाचा महाराष्ट्रातील लोकप्रिय प्रकार आहे. प्र + वद = पवद → पवउ → पवाडा → पोवाडा असा होतो.

वीरांच्या पराक्रमांचे, विद्वानांच्या मते बुद्धिमत्तेचे तसेच एखाद्याच्या सामर्थ्य, गुण, कौशल्ये इ. गुणांचे काव्यात्मक वर्णन प्रशस्ती किंवा स्तुती स्तोत्र म्हणजे पोवाडा असा पोवाडा शब्दाचा अर्थ महाराष्ट्रात शब्द कोशात दिला आहे.

पोवाड्याचा उल्लेख ज्ञानेश्वरी मध्ये 'पवद' असा केलेला आढळतो. महाराष्ट्रात छत्रपती शिवाजी महाराजांवर केलेले पोवाडे विशेष प्रसिद्ध पोवाड्यात ऐतिहासिक घटना सामोर ठेवून गीत रचना केली जाते. आणि खास वेगळ्या. अशा धाटणीने मनोरंजक पद्धतीने गायली जाते. पोवाड्या-ची गीते रचणाऱ्या आणि गाणाऱ्या लोक कलावंताना शाहीर असे म्हणतात



Photograph: Sanjay Pethe

# तमाशा

तमाशा हा गायन, वादन, नृत्य आणि विनोद युक्त असलेला लोक-नाट्यांचा एक आविष्कार आहे. तमाशा हा शब्द मूळ अरबी असून याचा अर्थ दृश्य, खेळ वा नाट्यप्रयोग असा आहे. तमाशाचे खेळ (प्रयोग) गावोगाव भरणाऱ्या जत्रात, उघड्यावर किंवा तंबूत घेत असतात. त्यामुळे प्रयोगाला फारसे नेपथ्य लागत नाही. तमाशात काम करणारी पुरुषपात्रे नेहमीच्याच वेशात असतात, तर स्त्रीपात्रांची वेशभूषा शक्य तितकी आकर्षक व उद्दीपक असते. तमाशातले गायक, वादक, सुरत्ये, नर्तकी सदैव मंचावरच असतात. या मंचाला तमाशाच्या भाषेत बोर्ड म्हटले जाते. गायनाला, ढोलकी, कडे, झांज, बाजाची पेटी आणि ट्रँगल यांची साथ असते. तमाशाच्या एक खेळामध्ये गण-गौळण, बतावणी, फार्स, रंगबाजी आणि वग असे पाच प्रकार आढळतात.



# भजन

देवांची स्तुतीपर काव्यरचना सामूसंगीत असून देवाला भजने केंवा आळविणे याला भजन म्हणतात. हा योगसाधनातील भक्तीयोगाचा भाग आहे. ही महाराष्ट्रातील एक लोककला आहे. स्थानिक स्तरावर संवादिनी (हार्मोनियम), मृदंग, तबला, ढोलकी, टाळ, टाळ्या यांचा वापर करून देवळात देवासमोर बसून वा शरीर संघटितपणे भजन गायले जाते.


वारकरी पद्धतीची भजने प्रसिद्ध आहेत. भजनाचे तीन प्रकार आहेत

- चक्री भजन
- सोंगी भजन
- रिंगण भजन



# वासुदेव

वासुदेव हा महाराष्ट्रातील गावांमध्ये सकाळच्या वेळी घरोघर हिंडून पांडुरंगावरील अभंग - गवळणी गात दान मागणारा लोककलाकार आहे. वासुदेव ही समाज प्रबोधन करणारी एक संस्था आहे. अशा शब्दात वासुदेवाचा गौरव केला जातो. आपण चांगले कर्म करीत राहावे आणि आयुष्यात मिळणाऱ्या चांगल्या वाईट अनुभवाची ईश्वरावर सोपवावी अशी वासुदेवाची जीवनदृष्टी आहे.



# भारूड

भारुड एक मराठी पदवाङ्मयाचा प्रकार आहे. याद्वारे रूपकामधून धार्मिक आणि नैतिक तत्वज्ञान सर्व सामान्यपर्यंत पोहोचविण्याचे कार्य केले आहे. अनेक संतांनी समाज प्रबोधनावर भारुडे लिहिली आहेत ज्ञानेश्वर आणि नामदेव या एकनाथपूर्व तसेच तुकाराम रामदास या एकनाथोत्तर आलेल्या संतांनी भारुडे लिहिली पण एकनाथ महाराजांसारखी विविधता त्यात नाही.

'भारुड' या शब्दाचा शब्दकोशातील अर्थ धनगर असा आहे. महाभारतात शकुंतला व्याख्यान, भारुड सांग हा गीतप्रकार ३ होता.



Rajdhani
DATE / /

# नृत्य (Dance)


DATE / /

# नृत्य

नृत्य, गायन आणि वादन या तिन्ही कलांचा संस्कृत वाङ्मयात एकत्र उल्लेख आढळतो. वैदिक काळात नृत्यादी कलांना शिल्प म्हणत. एक ललित कला. नृत = नाचणे या धातूवरून नृत, नृत्य, नर्तन इ. शब्द बनले आहेत. रस, भाव, व्यंजक इ. युक्त असलेले ते नृत्य म्हटले जाते. हात, पाय, मान, डोळे यांच्या हालचाली मृदुंगाच्या लयींना धरून चालू होतात. या सर्व हालचालींना शास्त्रशुद्ध बंदिस्तपणा असतो. लय सांभाळणे सर्व शारिरिक हालचाली लयीच्या ठोक्यात करणे हे या प्रकारचे वैशिष्ट्य होय.

# कुचिपुडी

पूर्वीचे आंध्रप्रदेशातील कृष्णा जिल्ह्यातील कुचिपुरम गाव
ील हे शास्त्रीय नृत्य. यात लास्य व तांडव दोन्हींचा उपयोग केला
ाते यातील स्त्रियांच्या भूमिका मोठ्या प्रमाणात पुरुष करतात. संपूर्ण
ादरीकरणात मध्यभागी किंवा शेवटी परात पायात धरून किंवा हंड्यांची
ावड डोक्यावर घेवून नृत्य सादर केले जाते.



# भरतनाट्यम

दक्षिणभारतातील तमिळनाडू प्रदेशातील तंजावर प्रातांत या
चा उगम झाला आहे मुळ राजा सर्फोजीशिवर भोसले यांच्या कार-
त हे नृत्य बहरले. गुरु कंउप्पा पिल्ले, गौरी, अम्मा, बाल सरस्वती
अय्यर, रामगोपाल, रुक्मिनीदेवी अरुंडेल, यामिनी, कृष्णमूर्ती
मिाला, गोविंदराज पिल्ले, पार्वतीकुमार इ. नी या शैलीच्या विकासात
मोठे योगदान दिले.





DATE / /


# मोहिनीअट्टम

केरळमधील नृत्य प्रस्तुती एक नर्तिका करते. विष्णूने मोहिनी
ा घेवून भस्मासूर दानवाचा वध केला. त्यावरूनच या नृत्याला नाव
ले. अट्टम म्हणजे नृत्य. त्रावणकोरीचे महाराज स्वातितिरुनाल हे
क पुरुष. गुरु श्रीकृष्ण पणिकर गोपीनाथ, कुंजन, कोयकुंची अम्मा
नक रेके इ. प्रमुख कलाकार पेहराव सोनेरी किनार असलेली पांढरी
डी पंख्यासारखा निर्या, सोनेरी आभूषणे केसांच्या एका बाजूस किंचित
कलेला अंबाडा त्यावर मोगऱ्याचे गजरे घालतात.



# भांगडा नृत्य

भांगडा नृत्य हे पंजाबी लोकनृत्य आहे. ल्यालपूर हे भांगडा नृत्याचे उगमस्थान आहे. हे नृत्य प्रामुख्याने शेतकऱ्यांचे नृत्य असून ते शेतीच्या हंगामात केले जाते. यात दोन्ही हातांना रंगीबिरंगी रुमाल बांधले जातात.





Rajdhani

DATE / /

# कथकली

दक्षिण भारतातील केरळचा नृत्य शैली प्रकार आहे. केली म्हणजे नृत्य हे नृत्य नाट्याच्या स्वरूपात असते. कथा सांगून नृत्य करणे कथा व केली या शब्दापासून कथकली नाव प्रचलित झाले. या शैलीतील मूळ पुरुष केरळ मधील वर्मी, रामायण, महाभारत या कथा सादर केल्या जातात



DATE / /

# कथक

कथक म्हणजे कथा सांगणारा. प्राचीन काळी हरदासपंथीय मंदिरातून पौराणिक कथा सांगत असत. नृत्याचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे चक्कर - गिरकी, नर्तकी व नर्तक तालाची आवर्तने दाखविण्यासाठी विविध प्रकारच्या गिरक्या घेऊन फिरतात. कथक या नृत्याला नटवरी पण म्हणतात. नटवर या नावाने कृष्णाला ताल, लय, नाट्य, अभिनय या विविध रूपांनी नटलेले नृत्य म्हणून ओळखतात.



# ओडिसा

ओडिसा नृत्याला शास्त्रीय नृत्य म्हणून मान्यता देण्याबाबत अनेक तज्ञामध्ये एकमत होत नसताना गुरू कुलचरण महापात्र यांनी अत्यंत संघर्ष करून या कलेला जगात मान्यता प्राप्त करून दिली. तांडव व लास्य दोन्ही शैलींचा नृत्याचा समावेश असतो. गुरु श्री मोहन महापात्र यांचे शिष्य केलुचरण महापात्र पंकजचरणदास, शोभा मुदुगल सोनल मानसिंह अनेकांचा या नृत्याविष्कारात सहभाग आहे. अलीकडे शुभदा ह्या ओडिसा नर्तिका म्हणून प्रसिद्ध आहेत.



Rajdhani
DATE / /

# स्वानुभव

शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर अंतर्गत आमच्या कॉलेज ऑफ एज्युकेशन (बी. एड) पेठ वडगाव या आमच्या कॉलेजमध्ये EPC - Drama Arts And Music in Education हे प्रात्यक्षिक घेण्यात आले आहे.

या प्रात्यक्षिक मध्ये आम्हाला वेगवेगळ्या नाटकांबद्दल माहिती मिळाली यामध्ये ऐतिहासिक नाटक, सामाजिक नाटक, एकांकिका, बाहुली नाटक यांची माहिती मिळाली. तसेच वेगवेगळ्या कला, संगीत, लोक-नृत्य, लोककला यांची माहिती मिळाली.

या प्रात्यक्षिक मधून आम्हाला हे समजले की, राष्ट्राचे नागरिक म्हणून कला शिक्षण हे मुख्य प्रवाहातील अभ्यासक्रम क्षेत्र म्हणून सादर केले पाहिजे आणि ते प्रत्येक शाळेत जाणे आवश्यक आहे. यासाठीच केवळ कला शिक्षकच नाहीत तर शालेय व्यवस्थेतील प्रत्येक शिक्षकाने संवेदनशील असले पाहिजे.

सर्व विविधतेमध्ये आणि समृद्धतेमे मध्ये आपली अनोखी संस्कृती टिकवून ठेवू आणि विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करू.

या प्रात्यक्षिकामध्ये आमच्यातील वेगवेगळ्या कलागुणांना वाव मिळाला. उदा. मेंहदी, रांगोळी, पोस्टर इ. आम्ही स्वत: तयार केले. तसेच वेगवेगळ्या वाद्य, संगीत, नाटक यांची माहिती मिळाली.

या प्रात्यक्षिकामुळे आमच्यात कलात्मक आणि सौंदर्यविषयक संवेदनशीलता वाढली, वेगवेगळ्या कलेबद्दल मनात जागृकता वाढली. तसेच आम्हांला आपली संस्कृती वारसा जपणारे कलाकार, कारागीर यांची माहिती मिळाली. यांच्याबद्दल आमच्या मनात आदरयुक्त भावना निर्माण झाली.

हे प्रात्यक्षिक पुर्ण करण्यासाठी आम्हाला प्राचार्या मॅडम तसेच सर्व शिक्षकांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

# समारोप

शिवाजी विद्यापीठ ,कोल्हापूर अंतर्गत कॉलेज ऑफ एज्युकेशन ... पेठ वडगाव येथे EPC Drama Art And Music in ...ducation हे प्रात्यक्षिक पूर्ण केले.

हे प्रात्यक्षिक पूर्ण करण्यासाठी महाविद्यालयाच्या प्राचार्या ... निर्मळे आर. एल. यांची प्रेरणा मिळाली. तसेच प्रा. सौ. शिरनोळे ... एल. ,प्रा. सौ. सावंत ए. पी, प्रा. श्री. ओस्टे एस. के. ,प्रा. सौ. ...कर जे. एस. यांचे मोलाचे मार्गदर्शन मिळाले. याबद्दल मी या ...ंची आभारी आहे.

Seen

Shri Balasaheb Mane Shikshan Prasarak Mandal,Ambap Sanchalit

# College of Education (B.Ed.) Peth Vadgaon.

# CERTIFICATE

This is to certify that Mr./Ms. Mane Divya Sagar

studing in B.Ed. I year , Semister II Roll No. 30 has

successfully completed the practical EPC-2 · Drama & Art

in education

during the academic year 2022 - 2023.

Principle

HOD

(Course head)